# COLLEGE OF ENGINEERING, PUNE

(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra )

5, Wellesly Road, Near Sangam Bridge, Shivajinagar, Pune - 411 005. INDIA

☎ Off. : + 91 - 20 - 25507010 / 25507310 ● Fax : +91 - 20 - 25507299 ● Email : acco@coep.ac.in

जा.क.अमपु/लेखा/ २०१९/ 1056 दि. 26 FEB 2019

परिपत्रक

विषय-महाविदयालयातील दुष्काळग्रस्त विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सुचना

संदर्भ-१ शासन निर्णय क.संकीर्ण.२०१८/प्र.क.३८१/तंशि.-४ दि.०५/११/२०१८

२ शासन निर्णय क.संकीर्ण.२०१८/प्र.क.३८१/तंशि.-४ दि.२०/११/२०१८

उपरोक्त संदर्भ क.१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील **Trigger-2** लागू झालेल्या १८० तालुक्यातील विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार परीक्षा शुल्क माफी असेल याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

ही परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याचा अधिवासी असलेल्या व रू ८.०० लक्ष या मर्यादेपर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विधार्थ्यांकरीता लागू राहील.

राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विदयार्थ्यांना या योजनेअंतर्गत ५० टक्के परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.

**परीक्षा शुल्क माफ सवलत खालील विदयार्थ्यांना लागु असणार नाही.**

अ) ज्या विदयार्थ्यांना शासन शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब) जे विदयार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.

क) जे विदयार्थी बहिस्थ(External) म्हणुन नोंदले असतील.

ड) ज्या विदयार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात.नोकरी धंदा करतात परंतु त्यांच्या नावे गावी शेतजमीन आहे.अश्या विदयार्थ्यांना.

वरील बाब विचारात घेता संस्थेच्या सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते कि सदर सवलतीस पात्र विदयार्थ्यांनी लेखा विभागाकडे सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लेखी अर्ज व त्या पृष्ठयार्थ खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावयाची आहे.

१ दुष्काळग्रस्त भागातील रहिवीसी असल्याचा पुरावा ( महाविदयालय ओळखपत्राची छायांकित प्रत)

२ पालकांच्या उत्पन्नाचा दाखला (अर्थिक वर्ष २०१७-२०१८)

३ आधार कार्ड ची छायांकित प्रत

४ बंधपत्र( स्वाक्षरीसह)

वरील प्रमाणे अर्ज व त्यासोबत सादर करावयाची कागदपत्रांची अंतिम तारीख ०८मार्च २०१९....आहे.

जे विद्यार्थी दिलेल्या वेळेत अर्ज सादर करणार नाहीत. व परिणामी परीक्षा शुल्क माफी सवलत पासुन वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विदयार्थ्यांची असेल याची नोंद घ्यावी.

संचालक,

अभियांत्रिकी महाविद्यालय,

पुणे

प्रत- विभागप्रमुख-विद्युत/उत्पादन/अणुविद्युत/धातुशास्त्र/उपकरणीकरण/यंत्र/संगणक व माहीती तंत्रज्ञान/स्थापत्य/प्लॅनिंग/परीक्षा कक्ष /विद्यार्थी विभाग-त्यांनी या आदेशाची प्रत विभागीय सुचना फलकावर लावावी.

# विदयार्थ्यांनी द्यावयाचे बंधपत्र

विदयार्थ्याचे नाव........................................................................................

**MIS NO.**.........................................................................................

शै.व.२०१८-२०१९ मधील वर्ग व शाखा **(Branch &Year)**..................................

प्रवर्ग.............................. शिष्यवृत्ती सवलत प्रकार.........................................

कायम स्वरूपी रहिवासी पत्ता......................................................................

..................................ता.........................................जि.........................................

आधार कमांक................................................मोबाईल क........................................

मी..............................................................अभियांत्रिकी महाविदयालय पुणे या संस्थेत चालु शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये प्रवेशित असुन उपरोक्त दिलेली माहीती ही संपुर्णतः खरी आहे.याची मी हमी देत आहे.परिक्षा अर्ज भरण्यासाठीच्या शासनाने दिलेल्या सर्व अटी व शर्ती( शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क. २०१८/प्र.क.३८१/तंशि.-४ दि.०५/११/२०१८ व क. २०१८/प्र.क.३८१/तंशि.-४ दि.२०/११/२०१८) मी वाचलेल्या असुन त्या मला मान्य आहेत.सदर अर्ज भरताना सादर केलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास होणा-या शिक्षेस मी पात्र असेल.

विदयार्थ्याचे नाव व स्वाक्षरी